डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id:sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
फोन क्र. ०२२ – २२८२ ६०२७ /
२२८१ ७६९८

## विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

परिपत्रक क्र.क्रीडा/ 83 /२०23 दि. 05/01/ २०24

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
१) मुंबई शहर क्रीडा विभागातील सर्व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये,
२) मुंबई उपनगर क्रीडा विभागातील सर्व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये.

**विषय:– श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक क्रीडा महाकुंभ सन २०२३–२४ च्या स्पर्धाबाबत..... .**
**संदर्भ:–विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र. ७६/२०२३ : दि. ०१/०१/२०२४**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला यावर्षी ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन व क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने पारंपारिक खेळांना वाव मिळावा, खेळाचा प्रसार व्हावा तसेच विद्यार्थ्यांना खेळाची माहिती मिळावी याउद्देशाने **श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक क्रीडा महाकुंभ सन २०२३–२४** चे आयोजन **दि. २६/०१/२०२४ ते १९/०२/२०२४** या कालावधीत मुंबई महानगर पालिकेचय शाळांच्या मैदानांवर तसेच सभागृहात सकाळी ८.३० वा. ते ६.३० वा. या वेळेत करण्यात आले असून त्यात १६ खेळांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात **लेझिम, लगोरी, लंगडी, रस्सी खेच, दंड बैठका, विटी दांडू, दोरीच्या उड्या, पंजा लढविणे, मल्लखांब, खो–खो, कबड्डी, आखाडा–कुस्ती, पावनखिंड दौड, शरीर सौष्ठव, ढोल–ताषा** अशा १६ क्रीडा प्रकारामध्ये समावेश करण्यात आला असून यामध्ये **खुला गट** ठेवण्यात आला आहे.

या स्पर्धा यशस्वीरित्या करणेकरीता **मुंबई विद्यापीठ, महाराष्ट्र शासन व क्रीडा भारती** यांबाबत करार केलेला आहे. याअनुषंगाने **मा. मंगलजी प्रभात लोढा (पालकमंत्री – मुंबई तथा मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन)** यांच्या मार्गदर्शनाखाली **दि. ०९ जानेवारी, २०२४ रोजी;स्थळ – डी.जी.रुपारेल महाविद्यालय, माहिम येथे वेळ – सकाळी ९.०० वाजता** बैठक आयोजित केली आहे. तरी सर्व महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक अथवा क्रीडा प्रमुख/क्रीडा प्रतिनिधी यांनी सदर सभेस उपस्थित राहावे.

हि विनंती. धन्यवाद!

UNIVERSITY OF MUMBAI ★ SPORTS & PHY. EDUN. ★

**सोबत:– १) खेळाची नियमावली..**

(डॉ. मोहन ना. आमृळे)
संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण







महाराष्ट्र शासन

श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक

# ।। क्रीडा महाकुंभ ।।

**१२ जानेवारी २०२४ ते २७ जानेवारी २०२४**

## नियमावली





अ‍ॅड. मंगल प्रभात लोढा
कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य

# खेळाचे नाव - मल्लयुद्ध

नियमावली:-

1.प्रत्येक वजन गटातील प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्या खेळाडूस सर्टिफिकेट व मानधन देऊन गौरवण्यात येईल.

2. मल्लयुद्ध स्पर्धा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमानुसार मातीवर घेण्यात येईल.

3. मल्लयुद्ध स्पर्धा मातीवर असल्यामुळे सर्व मुलांना किस्ताक व लंगोट घालने बंधनकारक राहील. लंगोट व किस्ताक शिवाय कुस्ती खेळवली जाणार नाही.

4. मुलींची कुस्ती स्पर्धा मातीवरच घेण्यात येईल. मुलींची कुस्ती टी-शर्ट व कॉस्ट्यूम शिवाय खेळवली जाणार नाही.

5.कुमार गटात खेळणाऱ्या खेळाडूचे वय सतरा वर्षापेक्षा कमी असावे.

6.पंचांचा निर्णय अंतिम राहील.

7.स्पर्धेचे नियम अटी व कार्यक्रम इत्यादींमध्ये बदल करण्याचा अधिकार संघटना समितीस राहील.

8.स्पर्धेदरम्यान कोणत्याही खेळाडूस दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी स्वतःची राहील.

9.वजनाच्या वेळेस स्वतःचे आधार कार्ड व पासपोर्ट साईज फोटो घेऊन येणे.

मल्लयुद्ध (वैयक्तिक स्पर्धा) -- ही पारंपरिक खेळ स्पर्धा मुंबई उपनगर स्तरावर खेळविण्यात येईल, सर्व वयोगट साठी स्पर्धा खुली असेल.

**Category –**
Male under 14 years , (weight categories 35 kg, 41 kg, 48 kg, 52 kg and above)
Male under 17 years (weight categories 45 kg, 48 kg, 51 kg, 55 Kg and above )
Male above 18 years (weight categories 57 kg, 61 kg, 65 kg, 74 Kg and above )
Female under 14 years (weight categories 36 kg, 44 kg, and above )
Female under 17 years (weight categories 46 kg, 53 kg, and above )

**Venu & Date** – 21st, 22nd and 23rd जानेवारी
मंगेश दुभाषी मैदान, विलेपार्ले पूर्व, साठे कॉलेज जवळ,

**Contact Person** - श्री राजू हाके ९९२०१३७४५४

# खेळाचे नाव – लगोरी

नियमावली:- लगोरीचे नियम (सात दगड)

1. समान खेळाडू असलेल्या दोन संघांमध्ये खेळला जाणारा खेळ (प्रत्येकी 8 खेळाडू 2 राखीव).

2. प्रत्येक संघाला दगड फेकण्यासाठी चेंडू फेकण्याची संधी मिळते जर एक संघ (फेकणारा संघ) असे करू शकला नाही तर संधी पुढील संघाकडे (बचावात्मक संघ) जाते.

3. लगोरी आणि खेळाडूंमधील अंतर 15 फूट ते 20 फूट असावे.

4. फेक करणाऱ्या संघाने दगड खाली पाडले तर ते स्टॅक पुन्हा एकत्र करण्याचा प्रयत्न करतात आणि बचावात्मक संघ फेकणाऱ्या संघाच्या खेळाडूंना चेंडूने मारण्याचा प्रयत्न करतो.

5. संरक्षणात्मक संघाच्या खेळाडूंनी त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या (संघाच्या) खेळाडूला गुडघ्याच्या खाली मारले पाहिजे.

6. बचावात्मक संघाच्या खेळाडूंना चेंडूने धावण्याची परवानगी नाही परंतु ते ते इतर संघातील सदस्यांना देऊ शकतात.

7. फेक करणाऱ्या संघाला स्टॅक एकत्र करावा लागतो आणि त्यांचा विजय घोषित करण्यासाठी खेळाचे नाव “लगोरी” असे ओरडावे लागते. 8. बचावात्मक संघाला प्रतिस्पर्ध्यांच्या खेळाडूला मारावे लागते मग ते विजयी होतील.

लगोरी (सांघिक स्पर्धा) -- ही सांघिक स्पर्धा प्रथम विभाग निहाय खेळविण्यात येईल, अंतिम विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्थरा वर खेळतील.

**Category –**
Under 17 and 17 years and above open category
Male / Female separate teams

**Venu & Date –**
25 जानेवारी बजाज रोड शाळा कांदिवली (प) स्टेशन जवळ,
24 जानेवारी गुंदवली मनपा शाळा सभागृह अंधेरी (पू) प्रकाश कॉलेज जवळ,
22 जानेवारी नेहरू नगर शाळा, सभागृह कुर्ला पूर्व,
20 जानेवारी गोशाळा सभागृह, मुलुंड (प) गोशाळा मार्ग

**Contact Person** - श्री शरद वाभळे ९८२०११२७२४

## खेळाचे नाव – लंगडी

नियमावली:-

1) लंगडी खेळामध्ये एकूण 15 खेळाडू असतात त्यापैकी बारा खेळाडू मैदानात खेळतात व तीन खेळाडू बदली राखीव खेळाडू असतात

2) आक्रमण व संरक्षण असे एकूण दोन डाव चार पाळ्या असतात

3) प्रथम आक्रमण करताना उजवा पाय जमिनीला टेकलेला व डावा पाय वर अर्ध्या स्थितीत याला उजव्या पायाने लंगडी असे म्हणतात

4) दोन्ही संघ उजव्या पायाने आक्रमण करण्यास सुरुवात करतील तर दुसऱ्या पाळी मध्ये डाव्या पायाने सुरुवात करतील

5) लंगडी घालणारा खेळाडू मैदानाबाहेर जाऊ शकतो परंतु तो मैदाना बाहेर गेल्यावरती कोणत्याही व्यक्तीस किंवा वस्तू स्पर्श करू नये तसेच तो मैदानात असताना त्याने जमिनीस हस्त स्पर्श करू नये असे केल्यास नियमलोंगण ठरेल त्याची लंगडी चे आक्रमण बाद ठरेल

7) संरक्षण करणारा (पळणारा) खेळाडू दिलेल्या रेषेच्या आतील चौकोनातच पळेल जर त्याचा पदस्पर्श अंतिम रेषेस झाला तर तो बात दिला जाईल

8) प्रत्येक तुकडीतून तीन खेळाडू संरक्षण करण्यात आत मध्ये मैदानात येतील

9) आक्रमण करणारे खेळाडू आक्रमण सुरुवात झाल्यावर एकूण बारा खेळाडू लंगडी घालू शकतात किंवा दिलेल्या वेळेत जेवढे लंगडी घालणारे खेळाडू होतील तेवढे ग्राहय धरले जातील एकदा लंगडीचे आक्रमण झाले तर त्या खेळाडूस पुन्हा लंगडीचे आक्रमण दिले जात नाही

10) संरक्षण करणारी तुकडी बारा खेळाडू आऊट झाल्यावर ती परत पहिली तुकडी मैदानात संरक्षण करण्याकरता येईल

काही नियम आपण मैदानात स्पर्धेच्या वेळी मुलांना सांगू

लंगडी (सांघिक स्पर्धा) -- ही सांघिक स्पर्धा प्रथम विभाग निहाय खेळविण्यात येईल, अंतिम विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्थरा वर खेळतील.

**Category –**
Under 16, under 18 and 18 years and above open category
Male / Female separate teams

**Venue & Date-**
24 जानेवारी आर्य भास्कर मैदान, गोकुळ धाम, गोरेगाव
23 जानेवारी कोलगेट मैदान, खेरनगर, वांद्रे पुर्व
18 जानेवारी कलेक्टर कॉलनी शाळा मैदान चेंबूर (पू )
16 जानेवारी संभाजीनगर मैदान, मुलुंड जीमखाना, मुलुंड पुर्व,

**Contact Person -** जयवंत बोभाटे ९१६८७६५३४२

## खेळाचे नाव – लेझीम

### नियमावली :-

१) १९ वर्षा खालील व १९ वर्षा वरील पर्यंतचे विदयार्थी किंवा संघ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. संघात कमीत कमी २५ आणि जास्तीत जास्त २८ विदयार्थी सहभागी होऊ शकतात.

२) लेझीम प्रकार - दख्खनी प्रकार

३) हलगी ताशा, ढोल, झांजा, घुंगरू, आणि शहनाई या उपयोगी करू शकतात.

४) वेळ मर्यादा - ०७ मिनिटे ( including entry and exit

५) शाळेने ठरवून दिलेला विशेष पोशाख हा लेझीम पथकाने धारण करावा.

६) Drum, whistle , band and recorded music will not be allowed

७) परीक्षणाचे मुद्दे- प्रत्येक स्तरावर पुढील मुद्द्यांच्या आधारे परीक्षण करण्यात यावे.

८) प्रवेश आणि निर्गमन

९) ताल सुसंगत हालचाल व शिस्त

१०) रचना

११) सुसंगतपणा

लेझीम (सांघिक स्पर्धा) -- ही सांघिक स्पर्धा प्रथम विभाग निहाय खेळविण्यात येईल, अंतिम विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्थरा वर खेळतील.

**Category –**
१९ वर्षा खालील व १९ वर्षा वरील करिता.

**Date & Venue -**
२० जानेवारी उन्नतनगर शाळा मैदान, रोड नंबर २, पाटकर कॉलेज समोर , गोरेगाव (प )
१९ जानेवारी संत रामदास मैदान, भटडा वाडी अंधेरी (प)
12 जानेवारी नेहरू नगर मैदान, कुर्ला पूर्व,
13 जानेवार प्रमोद महाजन मैदान, भांडुप (प)

**Contact Person -** श्री छगन थोरात ९९८७१६१४५६

## खेळाचे नाव - दोरीच्या उड्या

**नियमावली :-**

१)खेळाचा प्रकार सिंगल जंप वेळ ३० सेकंद पंच ( जागेवर रोप बरोबर उडया मारणे )

२) स्पर्धा खेळत असताना प्रत्येक खेळाडूला शॉर्ट पॅन्ट आणि टी शर्ट, शुज घालूनच स्पर्धा खेळण्यास परवानगी आहे.

3) खेळाडूंनी स्पर्धा खेळत असताना गैरवर्तणुक केल्यास त्याला स्पर्धेतून बाहेर काढण्यात येईल

4) खेळांडूकडे स्पर्धेचा गणवेश नसेल तर त्याला गणवेश बदलण्या करिता १ मिनिट वेळ दिला

5) खेळाडू स्पर्धेच्या रिंग मध्ये आल्यावर नंबर प्रमाणे उभे रहाणे त्या नंतर स्पर्धेची घोषणा होईल ती अशा प्रमाणे जजेसी रेडी, स्किपर रेडी, सेट, गो, म्हटल्या वर ३० सेकंद होईपर्यंत खेळाडूला जागेवर रोप बरोबर उड्या मारायच्या आहेत. ३० सेकंद मध्ये जरी तो अडकला किंवा थांबला तरी त्याची वेळ सुरु असतो, तयाने जितक्या उड्या मारल्या आहेत, तेवढयाच मोजल्या जातात.

6) स्पर्धेत ज्या खेळाडूचा स्कोर जास्त होईल तेच खेळाडू १ ते ३ मध्ये येतील.

7) स्पर्धेचे फाऊल :- १) जजेसी रेडी, स्किपर रेडी, सेट, गो, या घोषणेच्या आधी जर खेळाडूने उड्या सुरु केल्या तर त्याला फाऊल मानला जातो, त्या मध्ये खेळाडूच्या च्या ५ उड्या कमी केल्या जातात. २) जर एखादया खेळाडू ची स्पर्धा खेळत असताना त्याची रोप तुटली तर त्याला परत संधी दिली जात नाही व त्याने त्या वेळात जेवढ्या उड्या मारल्या तोच स्कोर लिहिला जातो.

8) एखादा खेळाडू स्पर्धा चालू झाल्यावर त्याला आखून दिलेल्या रिंग च्या बाहेर जात असेल तर जज खेळाडूला न थांबवता इशाऱ्याने सांगू शकतो परंतु त्यानंतर सुद्धा खेळाडू रिंग च्या बाहेर गेला तर त्याला बाद करण्यात येते.

दोरीच्या उड्या (वैयक्तिक स्पर्धा) -- प्रथम ही स्पर्धा शालेय, विभाग निहाय खेळविण्यात येईल, अंतिम विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्तरावर खेळतील

**Category-**

(१) १२ वर्ष मुलं / १२ मुली
(२) १४ वर्ष मुलं/ १४ मुली
(३) १६ वर्ष मुलं/ १६ मुली
(४) १८ वर्ष मुलं/ १८ मुली
(५) १८ वर्ष वरील सर्व मुलं

**Venu & Date-**

24 जानेवारी बजाज रोड शाळा सभागृह, स्टेशन जवळ कांदिवली (प)
22 जानेवारी गुंदवली मनपा शाळा सभागृह, अंधेरी (पू) प्रकाश कॉलेज जवळ,
25 जानेवारी नेहरू नगर शाळा सभागृह, कुर्ला पूर्व
23 जानेवारी गोशाळा सभागृह, गोशाळा मार्ग, मुलुंड (पुर्व)

**Contact Person-** श्री रितेश दाभोळकर 9762729695

## खेळाचे नाव - रस्सीखेच

### नियमावली:-

१.स्पर्धा वयोगट व वजनी गटानुसार घेण्यात येईल.

२. एका संघात ८+२ = १० खेळाडू असतील ८ खेळाडु प्रत्यक्ष मैदानात खेळतील व २ खेळाडू राखीव असतील.

वजनी गटानुसार या खेळाडूच वजन नियमानुसार झाले पाहिजेत राखीव खेळाडू कमी वजनाचा असावा व तो वजनी गटात बसणारा असावा संघासोबत १ मार्गदर्शक असावा.

३. स्पर्धा TWFI code 2013 या नियमानुसार होतील.

४. खेळाडूचा गणवेश टि शर्ट, हाफ पँट, स्पोर्ट्स शुज किंवा टग ऑफ वॉर शुज असावेत.

५. स्पर्धेतील वयोगट व वजनीगट

१६ वर्षाखालील मुले ४८० कि. मुली ४०० कि.

१९ वर्षाखालील मुले ५६० कि.  मुली ४४० कि.

१९ वर्षावरील गट पुरुष ६०० कि.  महिला ४८० कि. यानुसार घेण्यात येईल

रस्सीखेच (सांघिक स्पर्धा) -- ही सांघिक स्पर्धा प्रथम विभाग निहाय खेळविण्यात येईल, अंतिम विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्थरा वर खेळतील.

**Venu & Date-**
15 जानेवारी पोईसर हिंदी शाळा क्र. २, पोईसर डेपो, बोरिवली पश्चिम.
13 जानेवारी कोलगेट मैदान, खेरनगर, वांद्रे (पू)
20 जानेवारी टिळक नगर शाळा मैदान, चेंबुर,
19 जानेवारी संभाजीनगर मैदान, मुलुंड जिमखाना पूर्व,

**Contact Person -** विल्सन वरळीकर ९०८२२९५५२४

## खेळाचे नाव - मानवी मनोरे

नियमावली:-

1) वयोगटः ५ वी ते १२ वी पर्यंत मुले व मुली
2) गणवेषः टी शर्ट व हाफ पॅट (सर्व खेळाडूचा गणवेश एकच रंग व डिझाईनचा असावा), गणवेशासाठी स्वतत्र गुण असतील
3) स्पर्धा कालावधीः पहिला दिवसः पूर्व उपनगर-प्राथमिक फेरी. दूसरा दिवस पश्चिम उपनगर प्राथमिक फेरी. तिसरा दिवस. अंतीम फेरी सकाळी १० वा. प्राथमिक फेरी मधून निवडलेल्या ८ संघात अंतीम फेरी - दोन विभागातून प्रत्येकी ४ संघ.
4) खेळाडूंची संख्या व गटः २० ते २५ मुले । २० ते २५ महिला - दोन गट
5) एका संघातर्फे वरील गटांप्रमाणे एकूण जास्तीत जास्त ५० खेळाडू असतील.

6. स्पर्धा नियमः

a पाच मिनिटा मध्ये किमान ४ मानवी मनोरे संगीताच्या तालावर बनविणे

b प्रत्येक मनो-यात संघातील सर्व खेळाडूंचा (जास्तीत जास्त २५) समावेश असावा.

C. गुण पध्दतीत काठीण्य (difficulty), अंतीम रचना (final position), सहज सादरीकरण (execution), सगीत (music), एकत्र गुंफण (combination of players), खेळाडू मधिल कोऑर्डिनेशन (coordination from start to finish position), खांद्यावर अथवा हातावरील बॅलन्सेस (balances on hands or shoulders of one another), सघ गणवेश (uniform of team), थीम (theme of the pyramid) यावर अवलबून असेल.

d. मनो-या मधून एखादा संदेश (theme) देण्याची कल्पना असेल तर त्याची घोषणा मनोरे सुरु करण्यापूर्वी देण्यात यावी.

e प्रत्येक मनो-यास १० गुण असतील.

f. चार मनो-यास जास्तीत जास्त एकूण ४० गुण अपेक्षित आहेत.

मानवी मनोरे (सांघिक स्पर्धा) -- ही सांघिक स्पर्धा प्रथम विभाग निहाय खेळविण्यात येईल, अंतिम विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्थरा वर खेळतील.

**Category -**
Under 18  and above 18 open category, M/F

**Date & Venu –**
22nd जानेवारी बजाज रोड शाळा कांदिवली (प), स्टेशन जवळ,
25 जानेवारी मंगेश दुभाषी मैदान, विलेपार्ले पूर्व, साठे कॉलेज जवळ,
20 जानेवारी  शिव सृष्टी मैदान कुर्ला ईस्ट,
15  जानेवारी  गोशाळा मैदान, मुलुंड (प ) गोशाळा मार्ग,

**Contact Person -** श्री चेंबुरकर ७७३८७१२२००

## खेळाचे नाव - मल्लखांब

### नियमावली:-

मल्लखांब स्पर्धेकरिता पुढील प्रमाणे वयोगट असतील.

1) 14 वर्ष आतील मुले व मुली ,17 वर्षा आतील मुले व मुली ,19 वर्षा आतील मुले व मुली.

2) मुलांसाठी पोल मल्लखांब ( लाकडी मल्लखांब) आणि मुलींसाठी दोरीचा मल्ल संघखांब असेल.

3) किमान ६० सेकंद आणि कमाल ९० सेकंदाच्या अवधी मध्ये खेळाडूने त्याचा संच सादर करायचा आहे.

4) खेळाडूला ऐच्छिक संच सादर करायचा आहे.

5) मुलांसाठी हाल्फ पॅन्ट/ मल्लखांब जांग्या/ स्विमिंग पॅन्ट यापैकी तसेच मुलींना जिमसूट/ हाल्फ पॅन्ट - टीशर्ट (गोल गळा) यापैकी कोणताही एक युनिफॉर्म घालून संच सादर करायचा आहे

मल्लखांब (वैयक्तिक स्पर्धा) -- ही पारंपरिक खेळ स्पर्धा मुंबई उपनगर स्तरावर खेळविण्यात येईल, सर्व वयोगट साठी स्पर्धा खुली असेल.

**Venu & Date -** 16 जानेवारी समता क्रीडा भवन, M G क्रॉस रोड, कांदिवली (प )

**Contact Person -** श्री स्वप्नील चौगुले ९०२९४७३११२

## खेळाचे नाव - फुगडी

नियमावली:-

१) कमीत कमी ४ जणींच्या ग्रुप हवा

२) ३ फूट त्रिज्येचा गोलात फुगडी खेळणे.

३) प्रत्येक गटास सादरीकरणा साठी १० मिनिटाचा अवधी मिळेल.

परीक्षण, गुण

1) फुगड्यांची संख्या

2) फुगड्यांची निवड ( प्रकार )

3) उखाणा किंवा गाणे म्हणणें

4) प्रत्येक फुगडीचा वेळ

5) सादरीकरण

एकूण मार्क - ५०

फुगड्या (सांघिक स्पर्धा) -- ही सांघिक स्पर्धा प्रथम विभाग निहाय खेळविण्यात येईल, अंतिम विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्थरा वर खेळतील.

**Category –**

**Venu & Date –**

20 जानेवारी  M G रोड शाळा, CBSC, कांदिवली (प)

19 जानेवारी  गुंदवली शाळा, प्रकाश कॉलेज जवळ, अंधेरी (पू),

13 जानेवारी CBSC, आशिष तलाव शाळा, चेंबूर (पू )

12 जानेवारी माणिकलाल मेहता शाळा, घाटकोपर वेस्ट,

**Contact Persons -** श्रीमती शुभदा पाटणकर ९९६९६४२५३२

## खेळाचे नाव - पंजा लढवणे

नियमावली:-

खेळाडूसाठी खेळाचे नियम

1)स्पर्धा सेठ असताना प्रत्येक खेळाडूला ट्रैक पैन्ट आणि टी शर्ट सुज घालूनच स्पर्धा खेळण्यास परवानगी आहे

2) प्रत्येक खेळाडून हाताची नखे कापूनच स्पर्धा खेळणे बंधनकारक आहे

३) खेळाडूंनी स्पर्धा खेळत असताना गैरवर्तणुक केल्यास त्याला स्पर्धेतून बाहेर काढण्यात येईल

4) स्पर्धा वजन वयोगट नुसार घेण्यात येणार आहे. जर आपल्या वजन गटात खेळाडू सांख्या फक्त १ असेल तर आपल्याला वरील वजन गट किंवा पुढील वयोगटात मध्ये खेळावे लागेल.

5) प्रत्येक खेळाडूता स्टेजवर वण्यास व हाताची प्रीप पकडण्यास १ मिनिटाची वेळ देण्यात येईत

६) सर्वात प्रथम खेळाडू स्टज कर पातीत तथे आल्यावर पंच आपली तपासणी करतील, त्या नंतर पंच आपल्याता टवल जवळ घेऊन जातील, त्यानंतर राकी आपल्याला हाताची ग्रीप पकडण्यास सांगतील, खळाडूनी टेबलवर असलेल्या लाल व निळ्या रंगाच्या एल्बो टच पॅडवर हाताचे एल्बो टच करून आपल्या विरुद्‌ध हाताने टेबल वर असणाऱ्या पावर कट्रॉल रॉड पकडण्यास ठेवायचे आहेत. हाताची प्रीप पकडत्या नंतर रेळी रेडी गो बोलण्याची प्रतीक्षा करणे, रेडी गो" झाल्यावरच स्पर्धा सुरू करणे अन्यथा नाही स्पर्धा खळत असताना हात्ताची प्रीप सुटती तर रेफ्री ग्रीप देण्यात येईल म्हणजे रेफ्री

दोन्ही खेळाडूचे हा पकडून त्याना हाताची पीप बनवून देतील त्यानतर ही जर त्याची हाताची धीप सुटली तर मात्र त्याना स्ट्रैप मॅच राउत तळावा लागेल म्हणाने रेफ्री आपल्या जवळ असणान्या पट्टयान दोघांचे हात बाधतीस व नंतर स्पर्धा सुरु करण्यास सागतीत

७) स्पर्धेत खेळाडू विजय कसा होईत

खेळाडू विजय तेव्हा होईल जेव्हा आपल्या डाव्या बाजूला असणान्या विनिंग टन प्याठ वर हाताची ग्रीप टच होईल.

८) स्पर्धेतील वार्निंग (स्पर्धा सुरु होण्या आधी)

१)स्टेज वर उशीरा येणे 2)स्पर्धेच्या ठिकाणी अपशब्द वापरणे ३) हाताची नखे न कापून येणे ४) स्वर्धा गणवेश न घालणे ५ पंचा  सोबत वाद घालणे

९) स्पर्धेतील फाऊल (स्पर्धा सुरु असताना)

१) स्पर्धेच्या दिलेल्या वेळत हाताची ग्रीप न पकडणे २) आपल्या प्रति स्पर्धकाला हा पकडल्या नंतर अपशब्द बोलणे ३) स्पर्धा सुरु असताना आपल्या प्रति स्पर्धकाला टेबल खालून ताथ मारण्याचा प्रयत्न करणे ४) स्पर्धा सुरु असताना टेबल आपल्या प्रतिस्पर्धकाला अंगावर ढकलण्याचा प्रयत्न करणे ५) हाताचा एल्बो टन पेंड बरून उचलणे ६) हाताचा एल्बो टच पॅड वरून घसरणे ७) टेबल वर असणा-या पावर कंट्रोल रॉड वरून हात सुटणे ७) हाताची पकड सुटणे

१०) खेळाडू स्पर्धेतून बाद कसा होईल

दोन फाऊल झाल्यास खेळाडू स्पर्धेतुन बाद होईल. स्पर्धा सुरु होण्या आधी ज्या काही चुका खेळाडू कडून होतील त्या होत वार्निंग म्हणून पकडल्या जातील २ वार्निंग म्हणजे एक फाऊल आहे स्पर्धा सुरु झाल्यानंतर ज्या काही चुका खेळाडू गो कडून होतील त्या मात्र फाऊत म्हणून पकडल्या जातील २ फाऊल झाल्यास खेळाडू स्पर्धेतून बाद होईल

पंजा लढवणे  (वैयक्तिक स्पर्धा) -- प्रथम ही स्पर्धा शालेय, विभाग निहाय खेळविण्यात येईल, अंतिम विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्तरावर खेळतील

**Category –** स्पर्धेचे वजन गट व वयो गट टोटल वजन गट
1) 14 वर्षाखालील मुल (CHILDREN) (07 वजन गट)
वजनगट 32 कि., 37 कि., 43 कि., 50 कि., 58 कि., 66 कि. व 66+ कि.

2) 14 वर्षाखालील मुली (06 वजन गट)
वजनगट: 25 कि 29 कि.. 34 कि., 40 कि., 47 कि. व47+ कि.

3) 17 वर्षाखालील मुल (YOUTH) (07 वजन गट)
वजनगट 52 कि., 57 कि., 63 कि., 70 कि., 78 कि., 86 कि. व 86 कि.

4) 18 वर्षाखालील मुली (06 वजन गट)
वजनगट 45 कि., 49 कि.. 54 कि., 60 कि.. 67 कि. 67+ कि. पुरुष कनिष्ठ गट

5) SENIOR) (वय 19 वर्षे मुल) (09 वजन गट)
वजनगट 52 कि, 57 कि., 63 कि., 20 कि., 18 कि., 86 कि., 95 कि., 105 कि. व 105 कि.

6 ) महिला कनिष्ठ गट (वय 19 मुली) (07 वजन गट।
वजनगट: 50 कि  54 कि 60 कि., 67 कि., 75 कि., 83 कि., व83 कि. पुरुष वरिष्ठगट

**Venu & Date –**

19 जानेवारी  पोईसर शाळा हिंदी क्र. २, शाळा मैदान, एस व्ही रोड, पोईसर डेपो, बोरिवली पश्चिम

20 जानेवारी मंगेश दुभाषी मैदान, विलेपार्ले पूर्व, साठे कॉलेज जवळ
13 जानेवारी  नेहरू नगर मैदान, कुर्ला पूर्व
15  जानेवारी गोशाळा मैदान, मुलुंड (प ) गोशाळा मार्ग

**Contact Person -** श्री अरविंद चौहान ९७०२९३९६४२

## खेळाचे नाव :- दंड बैठक

नियमावली:-

1) खेळ वैयक्तिक असेल सूर्यनमस्कार दंड आणि बैठक असे दोन प्रकार असेल खेळाडू दोन्ही प्रकार मध्ये भाग घेऊ शकतात.

2)  180 सेकंदाच्या अवधी मध्ये खेळाडूने त्याचा परफॉर्मन्स सादर करायचा आहे. तीन मिनिटांमध्ये सगळ्यात जास्त दंड आणि बैठक चे संख्या असणारे खेळाडूंना पारितोषिक घोषित होईल.

दंड बैठका (वैयक्तिक स्पर्धा) -- प्रथम ही स्पर्धा शालेय, विभाग निहाय खेळविण्यात येईल, अंतिम विजेतेपदासाठी स्पर्धक मुंबई उपनगर स्तरावर खेळतील

**Category –**
16 वर्ष आतील मुले व मुली,19 वर्षा आतील मुले व मुली ,19 वर्षा पुढचे पुरुष व महिला.

**Venue & Date –**
22 जानेवारी बजाज रोड कांदिवली (प)
20 जानेवारी मंगेश दुभाषी मैदान, विलेपार्ले पूर्व, साठे कॉलेज जवळ,
25 जानेवारी नेहरू नगर मैदान,  कुर्ला पूर्व
24 जानेवारी संभाजीनगर मैदान, मुलुंड जिमखाना, मुलुंड पूर्व,

**Contact Person -** सुनील मल्ला 8425871273

## ढोल ताशा पथक

नियमावली:-

1) प्रत्येक पथकात कमीत कमी २५ जणांचा समावेश अवशक्य आहे.
2) प्रत्येक पथकास सादरीकरणा साठी १० मिनिटाचा अवधी मिळेल.
3) गुण खालील विषयानुसार मिळतील
   a) कार्यक्रमाची सुरुवात
   b) ताल सुसंगत हालचाल व शिस्त
   c) सर्वांमधील सुसंगतपणा
   d) पारंपरिक परिवेष

विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्थरा वर खेळतील.

**Category –** ओपन कॅटेगरी

**Venue & Date –** 27th January 2024
क्रीडाभारती ग्राउंड, निरंकारी भवना जवळ, मालवणी रोड, मालाड पश्चिम " सकाळी ९ वाजता

**Contact Person -**
संपर्क : संतोष हासुरकर 9082677614 श्री विजय पाटील ७९७७२२९३६१

## पावनखिंड दौड

1. हि स्पर्धा सर्व वयोगट आणि महिला पुरुषांसाठी खुली आहे
2. हि स्पर्धा ७ KM ची असणार आहे.
3. हि स्पर्धा ठीक ६.०० वाजता संजय गांधी नॅशनल पार्क येथे १४ जानेवारी ला आयोजित केली आहे.
4. स्पर्धा पूर्णपणे निशुल्क आहे .
5. विजेतेपदा साठी स्पर्धक मुंबई उपनगर स्थरा वर खेळतील.
6. ५ जानेवारी पर्यंत रेजिस्ट्रेशन ओपन असेल.

**Category –**

अंडर १६ मुले आणि मुली
अंडर १९ मुले आणि मुली
१९ वर्षे व वरील मुले आणि मुली
४५ वर्षे पुरुष व महिला

**Date & Venue -**

14 जानेवारी, राष्ट्रीय संजय गांधी उद्यान, बोरिवली (प)
स्पर्धा सकाळी ठीक ६ वाजता पासून सुरुवात होतील

**Contact Person -** श्री विजय शिंदे ९०८२१४४६३७

## खेळाचे नाव – वीठी दांडू

1. वीठी दांडू खेळामध्ये एकूण १२ खेळाडू असतात त्यापैकी ९ खेळाडू मैदानात खेळतात व तीन खेळाडू बदली राखीव खेळाडू असतात
2. प्रत्येक संघास एकूण दोन डाव मिळणार.
3. 60/52 शंकूच्या आकाराच्या मैदानात विटी-दांडू खेळला जातो
4. नाणेफेक जिंकणारा संघ कोल्ली किंवा क्षेत्ररक्षण ठरवतो

**Date & Venue -**

13 जानेवारी पोईसर हिंदी शाळा क्र २, शाळा मैदान, एस व्ही रोड, पोईसर डेपो, बोरिवली पश्चिम
16 जानेवारी कोलगेट मैदान, खेरनगर, वांद्रे (पू),
19 जानेवारी टिळक नगर शाळा, चेंबुर, टिळकनगर,
20 जानेवारी संभाजीनगर मैदान, मुलुंड जिमखाना मुलुंड पूर्व

**Contact Person -** श्री शरद वाबळे ९८२०११२७२४

श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक

# ॥ क्रीडा महाकुंभ ॥


मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय, 10 वा मजला, चेतना कॉलेजजवळ,
शासकीय वसाहत, वांद्रे पूर्व.

+९१ ९१३ ७६२५ ७५९ kridamahakumbh@gmail.com